# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 कार्यासन दु. क्र. 0712-6465145

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**अत्यंत महत्वाचे**

क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/समिती/2017/ 165

दिनांक:- 20 JAN 2017

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- संस्था स्तरावर तक्रार निवारण होणेहेतून संस्था स्तरावर विविध समित्यांची स्थापना करणेबाबत.

संदर्भ:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. 10/एनजीसी/तक्रार-समिती/2017/3017, दि. 13 जानेवारी 2017

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या संस्थांमध्ये कार्यरत कर्मचारी, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी व त्यांचे पालक इत्यादी यांचेमार्फत थेट या कार्यालयात व तंत्रशिक्षण संचालनालयास तक्रारी प्राप्त होतात.

त्याबाबत कळविण्यात येते की, संस्थांमध्ये कार्यरत कर्मचारी, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी व त्यांचे पालक इत्यादी यांचेमार्फत प्राप्त तक्रारींचे संस्था स्तरावर निराकरण होणे व जलद गतीने होणे आवश्यक आहे. त्याकरीता आपल्या संस्थेमध्ये अॅन्टी रॅगींग समिती, महिला तक्रार निवारण समिती, विद्यार्थी तक्रार निवारण समिती, कर्मचारी तक्रार निवारण समिती इ. समित्या तात्काळ स्थापन करण्यात ~~याव्यात~~ याव्यात. तसेच सदर समित्या स्थापन करण्यात आल्यानंतर संस्थेतील दर्शनिय भागावर समिती व समिती संपर्क याबाबत पत्रके लावून सदर बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व तक्रारीकरीता संबंधीत समितीशी संपर्क साधन्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

सदरहू समितीने संबंधीताकडून प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत पुर्णपणे सहकार्य करावे, तसेच या कार्यालयास व तंत्रशिक्षण संचालनालयास संबंधीतांकडून तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर समितीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व अभिप्राय पुढील कार्यवाहीकरीता संचालनालय स्तरावर विचारात घेतले जातील. जर संस्थेने तक्रारीबाबत समितीचा अहवाल व अभिप्राय या संचालनालयास सादर न केल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी संस्थेची राहील याबाबत नोंद घेण्यात यावी. सोबत संदर्भिय परिपत्रक आपणास योग्य कार्यवाहीकरीता जोडलेले आहे.

सोबत:- वरीलप्रमाणे परिपत्रक

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

D:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/तक्रार-समिती/2017/3090

दिनांक : 13 JAN 2017

**विषय : संस्था स्तरावर तक्रार निवारण होणेहेतून संस्था स्तरावर विविध समित्यांची स्थापना करणेबाबत.**

असे निदर्शनास आलेले आहे की, संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या तंत्रशिक्षण संस्थामध्ये कार्यरत कर्मचारी, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी किंवा त्यांचे पालक इ. यांचेमार्फत थेट संचालनालयास तक्रारी सादर केल्या जातात. संचालनालयास प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संचालनालयामार्फत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येते. तद्नंतर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांमार्फत चौकशी समिती नेमून अथवा संबंधीत संस्थेकडून अहवाल मागविण्यात येतो व सदर अहवाल संचालनालयास सादर करण्यात येवून त्यावर पुढील कार्यवाही करणे शक्य होते.

याबाबत असे कळविण्यात येते की, संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या तंत्रशिक्षण संस्थामध्ये कार्यरत कर्मचारी, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी किंवा त्यांचे पालक इ. यांचेमार्फत प्राप्त तक्रारींचे संस्था स्तरावर निराकरण होणे व जलद निराकरण होणे आवश्यक आहे. याकरीता संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व तंत्रशिक्षण संस्थांमध्ये अॅन्टी रॅगींग समिती, महिला तक्रार निवारण समिती, विद्यार्थी तक्रार निवारण समिती, कर्मचारी तक्रार निवारण समिती इ. समित्यांची स्थापना तात्काळ करण्यात यावी. तसेच संस्थेमध्ये सदर समिती स्थापन करण्यात आल्याबाबत संस्थेतील दर्शनीभागावर समिती व समिती संपर्क याबाबत पत्रके लावून सदर बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच संबंधीतांनी तक्रारीकरीता संबंधीत समितीशी संपर्क करावा अशा सूचना देण्यात याव्यात.

तसेच संबंधीत संस्थांनी सदर समितीच्या कार्यावाहीसाठी व तक्रार निवारण संस्थास्तरावर होणेहेतूने संबंधीत समितीस पुर्णपणे सहकार्य करावे. पुढे असेही नमूद करण्यात येते की, संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या तंत्रशिक्षण संस्थामध्ये कार्यरत कर्मचारी, शिक्षण घेत असलेले विद्यार्थी किंवा त्यांचे पालक इ. यांचेमार्फत संचालनालयास संबंधीतांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास याबाबत संस्थास्तरावरील समितीने केलेली कार्यवाहीचा अहवाल व सदर समितीचे अभिप्राय पुढील कार्यवाहीसाठी संचालनालय स्तरावर विचारात घेतले जातील. संबंधीत तक्रारींच्या अनुषंगाने संस्थांनी संस्थास्तरावरील समितीचा अहवाल व अभिप्राय संबंधीत चौकशी समितीस अथवा संचालनालयास सादर न केल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी संस्थेची राहील, राहील याची सर्व संबंधीत तंत्रशिक्षण संस्थांनी नोंद घ्यावी.

सहसंचालक, तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ....426
दिनांक 16 JAN 2017

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

1. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, 4 था मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा चौक, मुंबई-400032 (लक्षवेध : डॉ. किरण पाटील, उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग), यांना माहितीसाठी सादर.
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे, यांना कळविण्यात येते की, सदर बाब संबंधीत तंत्रशिक्षण संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने संबंधीत संस्थांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल घेण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल या संचालनालयास सादर करावा.
3. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
4. संचालनालयाच्या अखत्यारीतील सर्व तंत्रशिक्षण संस्था.(संबंधीत सहसंचालकांमार्फत).
5. कार्यासन क्रमांक 2, 2अ, मुख्य कार्यालय, मुंबई.